|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र. : ०२५७-२२५७२७६, २२५७२७७ फॅक्स क्र. : ०२५७-२२५८४०३, ४०६,
Umavinagar, Jalgaon Tel Nos. : 0257-2257276 to 2257277, Fax Nos.:0257-2258403, 406
Web : www.nmu.ac.in E-mail : registrar@nmu.ac.in & dr-approval@nmu.ac.in

दि. ०२/०२/२०२१

जा.क्र. कबचौउमवि/१०८/२०२१

प्रति,

१. मा. संचालक/विभाग प्रमुख, सर्व प्रशाळा व शैक्षणिक विभाग, कबचौ उमवि, जळगाव

२. मा. प्राचार्य, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न सर्व अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व समाजकार्य तसेच शिक्षणशास्त्र महाविद्यालये

विषय : विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. १८ जुलै, २०१८ मधील व शासन निर्णय दि. ८ मार्च, २०१८ मधील तरतुदीनुसार Academic/ Research Score तपासणी बैठकांचे वेळापत्रक व प्रस्ताव सादर करावयाच्या तारखेबाबत.

संदर्भ : १. जा.क्र. कबचौउमवि/ ६१७/२०१९ दि. १०/०६/२०१९

२. जा.क्र. कबचौउमवि/६६/२०२० दि. १५/०१/२०२०

महोदय/महोदया,

विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. १८ जुलै, २०१८ रोजी विद्यापीठ आणि महाविद्यालयांमधील शिक्षक आणि शिक्षक समकक्ष कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती/पदोन्नती संदर्भात केलेली किमान शैक्षणिक अर्हता इत्यादीच्या अनुषंगाने निर्गमित केलेली अधिसूचना तसेच महाराष्ट्र शासनाने दि. ८ मार्च, २०१९ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने मा.कुलगुरू महोदयांनी काढलेले निदेश क्र.४/२०१९ व दि. १० मे, २०१९ च्या शासन शुध्दीपत्रक तसेच विद्यापीठाचे निदेश क्र. ७/२०१९ जा.क्र. KBCNMU/18/Direction/1018/2019 दि. २५.९.२०१९ च्या अनुषंगाने विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांना Academic/ Research Score (पूर्वीचे नाव ए.पी.आय.) संदर्भातील गठीत विद्यापीठाच्या Academic/ Research Score समितीच्या बैठका आयोजित करण्यात येतात. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील अधिव्याख्यात्यांनी Academic/ Research Score सादर करणे संदर्भात उपरोक्त संदर्भ पत्र क्र. १ व २ अन्वये सविस्तर कळविण्यात आले आहे. कृपया त्याचे कटाक्षाने पालन करावे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील शिक्षक व्याख्याता मान्यता विभागाकडे वेळोवेळी आपले प्रस्ताव तपासण्यासाठी सादर करीत असतात. प्रस्ताव सादर केल्यानंतर तपासणीसाठी प्रशासकीय बाबीतून विचार करता विविध प्रकारच्या कामांना वेळ लागतो. मात्र शिक्षक व्याख्याता मान्यता विभागाकडे प्रस्ताव सादर करताच तो तपासणीसाठी घाई करतात. तेव्हा या संदर्भातील विद्यापीठाच्या Academic/ Research Score समितीने आखून दिलेली मार्गदर्शक तत्वे आपल्या माहिती करीता पुढील प्रमाणे कळवित आहोत :-

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमाप्रमाणे पदोन्नतीस पात्र शिक्षक त्याच्या पदोन्नतीच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आधी Academic/ Research Score तपासणीसाठी प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करु शकतात. विहित मुदतीत प्रस्ताव सादर करण्याच्या अंतिम तारखेनंतर प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. मुदतीनंतर आलेले प्रस्ताव पुढील बैठकीसाठी ग्राह्य धरण्यात येतील. त्यामुळे **पात्र शिक्षकांनी आपल्या पदोन्नतीच्या तारखेच्या तीन महिन्याआधी प्रस्ताव सादर करावेत, जेणेकरुन पदोन्नतीच्या पात्र तारखेच्या अगोदर आपणास ए.पी.आय. तपासणी प्रमाणपत्र मिळेल व तदनंतरची कार्यवाही करण्यास शिक्षकांना प्रतिक्षा करावी लागणार नाही.** दीड महिन्याच्या कालावधीत जमा झालेल्या एकत्रित प्रस्तावांच्या तपासणीसाठी बैठक होईल. पुढीलप्रमाणे प्रत्येक दोन महिन्यानंतर Academic/ Research Score समितीची बैठक होईल. व्याख्याता मान्यता विभागाकडे प्रस्ताव सादर करण्याचे व बैठकीचे वार्षिक वेळापत्रक पुढील प्रमाणे असेल :

| बैठक क्रमांक | विहित मुदतीत प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख | बैठकीची अंदाजे तारीख |
|---|---|---|
| पहिली बैठक | दि. १ जानेवारी ते दि. १५ फेब्रुवारी | फेब्रुवारी महिन्याच्या तिसऱ्या किंवा चौथ्या आठवडयात |
| दुसरी बैठक | दि. १ मार्च ते दि. १५ एप्रिल | एप्रिल महिन्याच्या तिसऱ्या किंवा चौथ्या आठवडयात |
| तिसरी बैठक | दि. १ मे ते दि. १५ जून | जून महिन्याच्या तिसऱ्या किंवा चौथ्या आठवडयात |
| चौथी बैठक | दि. १ जुलै ते दि. १५ ऑगस्ट | ऑगस्ट महिन्याच्या तिसऱ्या किंवा चौथ्या आठवडयात |
| पाचवी बैठक | दि. १ सप्टेंबर ते दि. १५ ऑक्टोबर | ऑक्टोबर महिन्याच्या तिसऱ्या किंवा चौथ्या आठवडयात |
| सहावी बैठक | दि. १ नोव्हेंबर ते दि. १५ डिसेंबर | डिसेंबर महिन्याच्या तिसऱ्या किंवा चौथ्या आठवडयात |

तरी मा. संचालक/ विभाग प्रमुख, प्राचार्य यांनी सदर बाब सर्व संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणून देवून उपरोक्त वेळापत्रकाप्रमाणेच API/ARS चे प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचित करावे, वेळापत्रकाप्रमाणे प्रस्ताव प्राप्त न झाल्यास कुठल्याही प्रकारे ते स्वीकारले जाणार नाहीत. तरी कृपया विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू,

2.2.21

(सहाय्यक कुलसचिव)

व्याख्याता मान्यता विभाग

प्रत - माहितीसाठी :

मा. उपकुलसचिव, कुलगुरू कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव

मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव

मा. सहा.कुलसचिव, प्र-कुलगुरू कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव

मा. कक्षाधिकारी, कुलसचिव कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव